खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### मराठी विभाग : 'वाचू अनुवादे...' विशेषांक प्रकाशन

राज्य लोकतंत्र
08 Mar 2026 - Page 3

## 'वाचू अनुवादे' या विशेषांकाचे प्रकाशन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** अनुवाद हा विविध भाषांमधील दुवा असून त्यातून भाषा, परंपरा आणि संस्कृती यांच्यात सुसंवाद निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी इतर भाषांमधून मराठीत अनुवादित झालेले दर्जेदार साहित्य वाचून स्वतःला समृद्ध करावे, असे आवाहन देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'वाचू अनुवादे' या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. दिलीप मुळूक आणि डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.

यावेळी बोलताना अॅड. बुट्टे पाटील म्हणाले की, अनुवादित साहित्यामुळे जागतिक आणि भारतीय भाषांमधील साहित्याची ओळख होते. वैविध्यपूर्ण आणि सकस साहित्याचे वाचन मनाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असून वाचनाचा आपल्या जीवनाशी संबंध जोडला तर आयुष्य अधिक समृद्ध आणि समाधानकारक होऊ शकते.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात वाचनासाठी वेळ काढावा, असे त्यांनी सांगितले.उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तिला वाव मिळावा आणि त्यांना वैविध्यपूर्ण वाचनाची सवय लागावी यासाठी पालक व शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी 'वाचू अनुवादे' या विशेषांकाच्या निर्मितीमागील उद्देश स्पष्ट केला. देश-विदेशातील विविध भाषांतील दर्जेदार साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे या हेतूने हा विशेषांक प्रकाशित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या विशेषांकामध्ये इकिगाई, डिसेप्शन पॉईंट, तोत्तोचान, तीन हजार टाके, हू मूव्हड माय चीज, विंग्स ऑफ फायर, पिंजर, द पॉवर ऑफ नाऊ आणि एका कोळीयाने आदी अनुवादित पुस्तकांचा परिचय करून देणारे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. पार्थ खाडीलकर यांनी मानले.

लोकमत



राजगुरु महाविद्यालयातील मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'वाचू अनुवादे' या विशेषांकाच्या प्रकाशन करताना मान्यवर.

# अनुवादित साहित्यामुळे विचारांची समृद्धी : बुट्टे-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** अनुवाद हा भाषांमधील दुवा आहे आणि त्याद्वारे दोन भाषा, परंपरा आणि संस्कृतींमध्ये सुसंवाद साधला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी इतर भाषांमधून मराठीत अनुवादित झालेल्या दर्जेदार साहित्याचे वाचन करून माणूस म्हणून समृद्ध व्हावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात 'वाचू अनुवादे' या विशेषांकाचे प्रकाशन

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'वाचू अनुवादे' या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील पुढे म्हणाले की, अनुवादित साहित्यामुळे जागतिक आणि भारतीय भाषांमधील साहित्याची ओळख होते. मनाच्या आरोग्यासाठी वैविध्यपूर्ण सकस साहित्याचे वाचन महत्त्वाचे असून, वाचनाचा आपल्या जगण्याशी अर्थ जोडला तर मनाच्या आरोग्याबरोबर आयुष्यही समाधानी होऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात वाचनासाठी आवर्जून वेळ काढावा, असे आवाहन त्यांनी केले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळेल व ते वैविध्यपूर्ण वाचन करतील याकडे पालक-शिक्षकांनी लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त केली. मराठी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक करताना त्यांनी प्राध्यापकांना सतत कार्यरत राहून नावीन्याचा शोध घेण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी जग व देशभरातील इतर भाषांमधील दर्जेदार पुस्तकांचे अनुवाद विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'वाचू अनुवादे' या विशेषांकाची निर्मिती केल्याचे सांगितले. या अंकामध्ये 'इकिगाई', 'डिसेप्शन पॉइंट', 'तोत्तोचान', 'तीन हजार टाके', 'हू मूव्हड माय चीज?', 'विंग्स ऑफ फायर', 'पिंजर', 'द पॉवर ऑफ नाऊ', 'एका कोळीयाने' आदि अनुवादित पुस्तकांचा परिचय करून देणारे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. सूत्रसंचालन व आभार प्रा. पार्थ खाडीलकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Mar 08, 2026
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# अनुवाद हा भाषांमधला दुवा : अॅड. बुट्टे पाटील

**। राजगुरूनगर : प्रतिनिधी**



अनुवाद हा भाषांमधील दुवा असून अनुवादामुळे दोन भाषा, परंपरा आणि संस्कृतीमध्ये सुसंवाद निर्माण होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी इतर भाषांमधून मराठीत अनुवादित झालेले दर्जेदार साहित्य वाचून माणूस म्हणून समृद्ध व्हावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त वाचू अनुवादे या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.

अॅड.बुट्टे पाटील पुढे म्हणाले की, अनुवादित साहित्यामुळे जागतिक आणि भारतीय भाषांमधील साहित्याची ओळख होते. मनाच्या आरोग्यासाठी वैविध्यपूर्ण सकस साहित्याचे वाचन महत्त्वाचे असून वाचनाचा आपल्या जगण्याशी अर्थ जोडला तर मनाच्या आरोग्याबरोबर आयुष्य समाधानी होऊ शकते.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळेल व ते वैविध्यपूर्ण वाचन करतील याकडे पालक-शिक्षकांनी लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. पार्थ खाडीलकर यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Mar 10, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख